नोंदणी क्र. ई - १३१४  नोदणी दिनांक - ०४-०८-२०२१

# संगमनेर विपश्यना समिती

१९४ /६ गणेशनगर, संगमनेर, ता. संगमनेर जि. अहमदनगर

जावक क्र. दिनांक : ०१ / ०७ / २०२६

**प्रति**

मा. शिक्षणाधिकारी (प्राथ.)जिल्हा परिषद अहिल्यानगर

**विषयः -** माहे जुलै २०२६ च्या केंद्र स्तरीय शिक्षण परिषदेत मित्र उपक्रमाचे प्रशिक्षण आयोजित करणेबाबत.

**संदर्भः-** १. जा.क्र. राशैसंप्रपम / कला व क्रिडा / मित्र उपक्रम प्रशिक्षण / सन २०२६ २७ दि. २९ मे २०२६

२. मा.आयुक्त (शिक्षण ), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक जा.क्र. आशिका / स्विस / मित्र उपक्रम २०१९ -२०२० / ४८५६ दि. ८ ऑगस्ट २०१९.

**महोदय,**

वरिल संदर्भीय विषयानुसार (सोबत परिपत्रक जोडलेले आहे.) विनंती करण्यात येते की, माहे जुलै २०२६ च्या केंद्र स्तरिय शिक्षण परिषदेत सर्व शिक्षकांसाठी मित्र उपक्रमांतर्गत आनापान साधनेचे तीन तासाचे प्रशिक्षण आयोजित करणेबाबत सुचना दिलेल्या आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यात संगमनेर विपश्यना समिती संगमनेर, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर येथे मागील पाच वर्षांपासुन कार्यरत आहे. या केंद्रावर नियमीतपणे १ दिवसीय विपश्यना शिबीराचे आयोजन केले जाते. येथे स्थानिक तसेच देशातील लोक विपश्यना साधनेचा लाभ घेत असतात.

केंद्र स्तरावरील शिक्षण परीषदेत केंद्र प्रमुख तसेच गट शिक्षणाधिकारी मार्फत शिक्षकांचे मित्र उपक्रमांतर्गत आनापान साधनेचे प्रशिक्षण घेण्यासाठी केंद्र प्रमुख तसेच इतर वरीष्ठ अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण पुर्ण करणे आवश्यक आहे. जेणे करुन ते प्रशिक्षीत होवुन प्रशिक्षण देवु शकतील. यासाठी संगमनेर विपश्यना समिती अंतर्गत आपल्या सोईनुसार योग्य त्या ठिकाणी दोन वा तीन चार ठिकाणी वेगवेगळ्या तारखांना अधिकारी, केंद्रप्रमुख व ईतरांचे प्रशिक्षण पुर्ण करण्यासाठी आम्ही पुर्णपणे सहकार्य करुत.

कृपया आपण या बाबत आपल्या स्तरावर योग्य ते आदेश निर्गमीत करावे ही विनंती. या प्रशिक्षण कामी संगमनेर विपश्यना समिती तर्फे मित्र उपक्रम जिल्हा समन्वयक श्री. जगदीश आसावा यांची नेमणुक केलेली असुन आपण (मो.नं.९४२२८७०५१५ / ९३७२०१००२२) यांचेशी संपर्क साधावा.

**आपले संगमनेर विपश्यना समिती**